शाहू महाराजांच्या विचारांचे आजही आचरण गरजेचे - श्री. प्रसाद कुलकर्णी

"शाहू महाराजांचे विचार आजही अभ्यासणे गरजेचे आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर जाती-पातीच्या भिंती पाडल्या जातील आणि भारतीय जनता एकोप्याने राहील अशी भूमिका सर्वच समाज सुधारकांनी मांडली. आजच्या 21 व्या शतकामध्ये या जाती-पातीच्या भिंती अधिक रुंद होताना दिसत आहेत. त्यामुळे शाहू महाराजांचे विचार आजही आचरणात आणणे गरजेचे आहे कारण शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये भारतातील पहिले आरक्षण सुरू केले. आणि जाती-पातीचा भेद कमी करण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले." असे प्रतिपादन समाज प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वाङःमय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित " छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांची समकालीनता " या व्याख्याना प्रसंगी बोलत होते. त्यांनी शाहू महाराजांच्या जीवन प्रवासावर प्रकाशझोत टाकत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या वार्षिक अंक 'मदनामृत' व सहामाही वार्तापत्र 'व्यंकटेश बुलेटीन' चे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी दोन्ही संपादक मंडळांचे अभिनंदन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांची ओळख वाङःमय मंडळाच्या विभाग प्रमुख डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी करून दिली. अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी विद्यार्थ्यांना शाहू महाराजांच्या विचारांची आज का गरज आहे याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका डॉ. एस. आर. ठाकर यांनी केले. आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉ. डी. एस. कांबळे यांनी मांडले. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.